# प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना

## प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी कार्यप्रणाली

लाभार्थी आधारकार्ड, बँक पासबुक व भ्रमणध्वनी क्रमांकासह नागरी सुविधा केंद्रास भेट देईल.

↓

नागरी सुविधा केंद्राकडुन लाभार्थीची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्यात येईल.

↓

लाभार्थीच्या वयानुसार मासिक अंशदानाच्या रक्कमेची गणना सिस्टीमद्वारे ऑनलाईन करण्यात येईल.

↓

लाभार्थीकडुन पहिल्या महिन्याच्या अंशदानाची रक्कम नागरी सुविधा केंद्रास रोखीने अदा करण्यात येईल.

↓

अंशदानाची रक्कम अदा केल्यानंतर LIC द्वारे पेन्शन खाता क्रमांक जारी करण्यात येईल.

↓

लाभार्थीची स्वाक्षरी करण्यासाठी स्वंयघोषणा पत्राचा नमुना प्राप्त होईल.

↓

लाभार्थीने स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र नागरी सुविधा केंद्राकडुन स्कॅन करण्यात येऊन सिस्टीममध्ये अपलोड करण्यात येईल.

↓

नागरी सुविधा केंद्रामार्फत श्रम योगी कार्डची प्रिंट काढण्यात येऊन लाभार्थीस सुपूर्त करण्यात येईल.

↓

बँके कडुन खातर जमा केल्यानंतर नियमित अशंदान लाभार्थीच्या बँक खात्यामधून (auto-debit पद्धतीने) सुरू होईल.

↓

भविष्यामध्ये जमा होणाऱ्या अंशदानाबाबतची माहिती लाभार्थीस एसएमएसद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.